# PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com


PARLE MAHOTSAV

दि. २३.१२.२०१४

<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>

## मुंबईमध्ये पहिल्यांदाच रंगली बीच हॉलिबॉल स्पर्धा

## पार्ले महोत्सवात तीन दिवसात पाच हजारहून अधिक खेळाडूंचा सहभाग

मुंबई : यंदाच्या १५व्या पार्लेमहोत्सवात सलग तिसऱ्या दिवशी अजून एका नवीन खेळाचा समावेश झाला. या महोत्सवात आणि अखिल मुंबईत पहिल्यांदाच बीच हॉलिबॉल स्पर्धा पार पडली. जुहू बीचवर झालेल्या या हॉलिबॉल स्पर्धेत तब्बल ३५ संघ आणि ७० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कल्पेश पटेल व योगेश नेगी हे या मुंबईत रंगलेल्या पहिल्या बीच हॉलिबॉल स्पर्धेचे विजेते ठरले.  छत्रपती पुरस्कारविजेते दिनकर देशपांडे यांनीही या बीच हॉलिबॉल स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

पार्ले महोत्सवाच्या पहिल्या तीन दिवसातच अनेक राष्ट्रीय खेळाडूंनी आपले क्रिडाकौशल्य रसिक प्रेक्षकांपुढे सादर केले आहे. त्यामुळे या स्पर्धेतील चुरस दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. आतापर्यंत विविध स्पर्धांतून तब्बल पाच हजार खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. जवळपास एक हजार कार्यकर्त्यांच्या सक्षम फळीमुळे आम्हाला या स्पर्धा यशस्वी करता येतात, असे पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी सांगितले. दुभाषी मैदानावर रंगलेल्या विविध मैदानी स्पर्धेतील पुरुष हॉलिबॉल गटात ६० संघ व ७२० खेळाडूंनी तसेच महिला हॉलिबॉल स्पर्धेत १८ संघ व २२२ खेळाडूंनी आपला खेळ सादर केला आहे. कबड्डीमध्ये १२८ संघानी सहभाग घेतला. या दोन्ही स्पर्धा यापुढेही सुरू राहणार आहेत. तर बॉक्स क्रिकेटमध्ये १०० हून अधिक संघ सहभागी झाले होते. स्पर्धेत प्रथम समाविष्ट केलेल्या डॉजबॉल खेळात पुरुष गटात आय.एन. स्पोर्टस, भांडुप तर महिला गटात उत्पल संघ,जुहू हे विजयी ठरले आहेत.

———————————————————————————————————

सदर पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.